प्रेसनोट – दिनांक १६/०७/२०१९

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

घरामधुन पळुन गेलेल्या अल्पवयीन मुलीच्या आई-वडीलांचा शोध घेतले बाबत.

---

मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दिमध्ये आज दि.१५/०७/२०१९ रोजी काही दिवसांपासुन शिवनेरी रोड रस्त्यावर एक अल्पवयीन मुलगी वारंवार फिरत असलेले बाबत माहिती मिळाली.मार्केटयार्ड पोलीस स्टेशनकडील म.पो.शि. ९४४२ मगर,म.पो.शि. ९२८० महाजन व म.पो.शि. ९४२५ लाहिगडे यांनी तात्काळ त्यामुलीस ताब्यात घेवुन आजुबाजुस विचारणा केल्यास खाजगी सुरक्षा रक्षकांनी २ ते ३ दिवसांपासुन ही मुलगी इथेच फिरत असलेबाबत सांगितले.

म.पो.शि.९४४२ मगर, म.पो.शि.९२८० महाजन व म.पो.शि.९४२५ लाहिगडे यांनी मुलगी खुप भुकावलेली असल्याने,त्या मुलीस जेवायला दिले व त्यानंतर मुलीकडे पोलीसांनी तीच्याबद्दल विचारणा केल्या नंतर मुलीने तीचे नाव,वय-१५ वर्षे,रा.हिंगणे होम कॉलनी,कर्वेनगर पुणे असे सांगितले. तीचे एका मुलावर प्रेम असल्याने ती घरच्यांना न सांगता घरातुन पळुन आल्याचे सांगितले.

म.पो.शि.९४४२ मगर,म.पो.शि.९२८० महाजन व म.पो.शि.९४२५ लाहिगडे यांनी तात्काळ त्या मुलीस तीने सांगितलेल्या पत्यावर घेवुन गेले. त्याठिकाणी गेल्यानंतर मुलीच्या आईने मुलीला पाहिल्यानंतर आईच्या डोळ्यात आनंदाचे अश्रु आले व त्यांना पोलीसांची काम करण्याची पद्धत पाहुन पोलीसांना भरभरुन आशिर्वाद दिल आहे..